# 'बीकेसी' स्थानक महत्त्वाचे

- मेट्रो ३ चे भूमिगत स्थानक अंतिम टप्प्यात
- मेट्रो २ ब द्वारे थेट मानखुर्दपर्यंत संलग्नता

## पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडणाऱ्या दोन मार्गिका ठरतील फायद्याच्या

म. टा. खास प्रतिनिधी

मुंबई : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ मार्गिकेवरील बीकेसी स्थानक हे दोन मार्गिकांना जोडणारे ठरणार आहे. या भूमिगत स्थानकाची उभारणी अंतिम टप्प्यात आली आहे. भविष्यात हे स्थानक मेट्रो २ ब शी जोडले जाणार असल्याने बीकेसी परिसर थेट मानखुर्दशी संलग्न होणार आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मेट्रो-३ या मार्गिकेची कामे झपाट्याने सुरू आहेत. हा प्रकल्प मुंबईला पश्चिम उपनगरांच्या माध्यमातून उत्तर-दक्षिण जोडतो. प्रकल्पाचा पहिला टप्पा आरेजवळील सारिपूतनगर ते बीकेसी उत्तर (प्राप्तीकर कार्यालय स्थानक) असा असेल. या पहिल्या टप्प्यात बीकेसी उत्तर हे स्थानक अखेरचे तर दक्षिण बाजूने पहिले असेल. या स्थानकाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

ही मार्गिका उभी करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (एमएमआरसीएल) हे स्थानक अंतिम टप्प्यात असल्याने जाहीर केले आहे. विविध कारणांनी आरे कारशेडला विलंब झाल्याने मेट्रोच्या पहिल्या टप्प्याचे नियंत्रण सुरुवातीला बीकेसी उत्तर या स्थानकातूनच केले जाणार आहे. त्यासाठी या स्थानकावर विशेष नियंत्रण व देखरेख कक्ष उभा केला जात आहे. त्यामुळेच हे स्थानक ४७४ मीटर लांब आणि ३२.५ मीटर रुंद असून या मार्गिकेवरील सर्वात मोठे स्थानक असेल. या मार्गिकेवरील अन्य स्थानके सरासरी २५० मीटर लांब व २५ मीटर रुंदीची आहेत, हे विशेष.



### बीकेसीला डायमंड बोर्सशी जोडणार

'मेट्रो २ ब वरील बीकेसी स्थानकाला थेट डायमंड बोर्सशी जोडण्याचे नियोजन केले जात आहे. यासंबंधीचे काम सध्या प्राथमिक टप्प्यात आहे. मेट्रो २ ब ही पहिल्या टप्प्यात मंडाला ते कुर्ला असेल. दुसऱ्या टप्प्यात बीकेसी स्थानकाची उभारणी होईल, असे सुरुवातीपासूनचे नियोजन आहे. परंतु बीकेसीद्वारे चांगली संलग्नता मुंबईकरांना उपलब्ध होईल', असे एमएमआरडीएचे महानगर आयुक्त एसव्हीआर श्रीनिवास यांनी सांगितले.



या भूमिगत स्थानकाच्या जवळून पुढील काळात ईएसआयसीनगर ते मंडाला (मानखुर्द) अशी मेट्रो २ ब ही मार्गिका जाणार आहे. ही मार्गिक उभी झाली की, मेट्रो २ ब वरील बीकेसी स्थानक व मेट्रो ३ वरील प्राप्तीकर कार्यालय स्थानक एकमेकांशी जोडले जाणार आहे. परिणामी मेट्रो ३ ला बीकेसी परिसरातून ते मानखुर्दपर्यंत संलग्नता मिळणार आहे.